# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३३३** **दिनांक २७/११/२०२१**

## अंमली पदार्थ कब्जात बाळगणा-या व जबरी चोरी करणा-या दोघांच्या मुसक्या आवळुन एक किलो १०० ग्रॅम गांजा व जबरी चोरीतील मोटार सायकल हस्तगत .

दिनांक 25 नोव्हेंबर 2021 रोजी 15:50 वाजताच्या सुमारास वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण पथकास " प्रदीप सिंग व मैनुद्दीन नावाचे दोन इसम गांजा हा अंमली पदार्थ घेऊन चिंचोटी, आशानगर खदानीजवळ येणार आहेत " अशी बातमी मिळाली. प्रस्तुत प्रकरणी पोलीस उप आयुक्त श्री. संजयकुमार पाटील यांना माहिती देवून त्यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील तसेच वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण पथकाच्या अंमलदारांनी कारवाई करुन मौजे नायगाव पूर्वस्थित चिंचोटी येथील आशा नगर खदानी जवळील पानाच्या टपरी शेजारुन ईसम नामे 1) प्रदिप शिवदत्त सिंग वय 30 वर्ष आणि 2) मैनुद्दिन आयुब शेख वय 25 वर्षे यांना 1 किलो 100 ग्रॅम वजनाच्या 10 हजार रुपये किंमतीच्या गांजासह रंगेहाथ ताब्यात घेतले. तसेच उभय आरोपीतांकडुन वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. 1274/2021 भारतीय दंड संहिता कलम 392, 34 अन्वये दाखल गुन्हयातील जबरी चोरी केलेली यामाहा कंपनीची एफ झेड मॉडेलची सिल्वर कलरची मोटार सायकल क्र MH-48-J-0598 हि देखील ताब्यात घेण्यात वालीव पोलीसांना यश आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी वालीव पो. ठाण्यात गुन्हा नोंद क्रमांक 1345/2021 एन.डी.पी.एस. कायदा 1985 चे कलम 8(क), 20(ब), II (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक श्री. प्रशांत चव्हाण हे करीत आहेत.

सदर गुन्हयात अटक करण्यात आलेला आरोपीत प्रदिप सिंग हा सराईत अंमली पदार्थ विक्री करणारा ईसम असून वालीव पोलीस ठाण्याचे 1) गुन्हा नोंद क्रमांक 1319/2021 एन. डी. पी. एस. कायदा 1985 चे कलम 8(क),20(ब), II (ब) अन्वये दाखल एका अपराध प्रकरणांत पाहिजे असलेला आरोपी होता.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-2 वसई, श्री. पंकज शिरसाठ, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोनि/ राहूलकूमार पाटील (गून्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोहवा. मनोज मोरे, मुकेश पवार, पो.ना. सचिन दोरकर, राजेंद्र फड, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, व जयवंत खंडवी अश्यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

----000----